# पारलिंगींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे का नाहीत?

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

## मानवाधिकार आयोगाची विचारणा

पारलिंगी नागरिकांसाठी स्वतंत्र (जेंडर न्यूट्रल) स्वच्छतागृह का नाही, असा प्रश्न उपस्थित करत राज्य मानवाधिकार आयोगाने हा विषय स्वप्रेरणेने (सुओ मोटो) विचारार्थ दाखल करून घेतला आहे. तसेच मुंबई सीएसएमटी स्थानकाजवळच्या हजारीमल सोमाणी मार्ग येथे या आयोगासह अनेक सरकारी कार्यालये व न्यायाधिकरणे असलेल्या आस्थापनेतील या अभावाविषयी पीडब्ल्यूडीकडे विचारणा केली आहे.

'या वास्तूमध्ये क्रीडा विभाग, ग्राहक तक्रार निवारण मंच, मोटार अपघात दावे न्यायाधिकरण मुंबई, युवक बिरादरी यांसह अनेक कार्यालये आहेत. त्यामुळे पक्षकार, वकील, अभ्यागत यांची कायम वर्दळ असते. मात्र, या ठिकाणी पारलिंगी (तृतीयपंथी) नागरिकांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असणे आवश्यक असल्याचे आयोगाला वाटते. तसेच अशी सुविधा नसणे हे प्रथमदर्शनी त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन ठरते. म्हणून हा विषय आम्ही स्वप्रेरणेने विचारार्थ दाखल करून घेत आहोत', असे आयोगाचे अध्यक्ष न्या. बदर व सदस्य संजय कुमार यांच्या खंडपीठाने नुकत्याच दिलेल्या अंतरिम आदेशात म्हटले आहे.